# प्रेसनोट

## वसंतराव नाईक यांची जयंती

जा.क्र. ४८२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः–०१/०७/२०१७

भंडाराः– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. ०१/०७/२०१७ रोजी मा. पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहु यांच्या अध्यक्षतेखाली वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली.

स्व. श्री. वसंतराव नाईक यांचा जन्म ०१ जुलै १९१३ मध्ये गहुली ता. पुसद जि. यवळतमाळ येथे निर्सगाच्या कुशीत बसलेल्या छोटेखानी या गावात एका बंजारा कुटुबांत झाला. त्यांचे शिक्षण बि. ए. एल. बि. पर्यत झाले ते मुख्यमंत्री होण्यापुर्वी त्यांनी सहकार, कृषी, महसुल या खात्याची मंत्री पदे त्यांनी सांभाळली आहेत. राजकारणा मध्ये अस्पृश्यता निवारण, स्त्रि शिक्षण व समाज जागृती या सारखे कार्य करण्याचे बाळकडुन यांचे वडील व आई होनुबाई यांचे कडुन वसंत रावाना बालपणीच मिळाले होते.

डॉ. बाबासाहेब आंबडेकर अशा विचारवंता कडुन सामाजीक कार्याची प्रेरणा घेतली देशाच्या स्वातंत्र्यापुर्वी सन १९४१ मध्ये त्यांना समाज शिक्षण प्रशसा पत्र देवुन गौरविण्यात आले होते. सन १९५२ मध्ये कॉंग्रेस पक्षा तर्फे आमदार निवडणुकीत निवडूण आले व ५ डिसेबर १९६३ मध्ये विधीमंडळात त्यांची महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणुन निवड करण्यात झाली त्यानंतर त्यांनी सन १४ फरवरी १९६४ रोजी नाईक सरकारणे मराठी ही सरकारची राज्यभाषा राहील असा महत्वाचा निर्णय घेतला. पुढच्या दोन वर्षा मध्ये महाराष्ट्र अन्न धान्या बाबत सन पुर्ण झाला नाही तर मला फाशी दया असे त्यांनी सन १९६५ मध्ये जाहीर केले.

त्यांनी सन १९७५ मध्ये मुख्यमंत्री पंदाचा राजीणामा दिला. तोपर्यत त्यानी राज्याचा चेहरा मोहरा बदलुन टाकला व सन १९७७ साली राज्याचा हा नेता लोकसभेवर खारदार म्हणुन निवडुण आले. अत्यंत सौजन्यशील, नम्र, सुसंस्कृत, न रागवता सतत हसमुख असनारा नेता सलग १२ वर्ष, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद सांभाळणारा शेतकऱ्यांचा कैवारी १८ ऑगस्ट १९७९ मध्ये सिंगापुर येथे स्वर्गवासी झाले.

यावेळी कार्यक्रमाला प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) एम.एम. सिडाम, पोनि. धुसर स्थागुशा भंडारा, सपोनि. क्रिष्णा हत्तीमारे जिवीशा भंडारा, नियत्रंण कक्ष अधीकारी पोउपनी. लाकडे, सपोनि रहागंडाले पोलीस उपनिरीक्षक तुळजेवार नियत्रंण कक्ष अधीकारी, पोलीस मुख्यालय भंडारा राखीव पोलीस उपनिरीक्षक श्री. प्रधान व पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

1-7-2017

सपोनि. के. एम. हत्तीमारे
जि.वी.शा भंडारा करीता
दुरध्वनी.क्र.९४२२८३२१७८

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.